स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य विद्याशाखेंतर्गत पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

लातूर जिल्हयाच्या आर्थिक विकासात दाळ उद्योगाचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक

गजानन हरिदास पळनाटे

एम.कॉम, सेट-नेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.संतोष निवृत्तीराव घोंगडे

एम.कॉम, पीएच.डी.

वाणिज्य विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

जुलै 2024

लातूर जिल्हयाच्या आर्थिक विकासात दाळ उद्योगाचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना

वाढत्या लोकसंख्येबरोबरच आणि प्रगतीबरोबरच डाळ व डाळ पिकांपासून मिळणाऱ्या पदार्थाची मागणी आणि महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. विविध प्रकारच्या डाळींमध्ये प्रथिने व कॅलरीज मोठया प्रमाणात असतात त्यामुळे मानवी आहारात डाळीचे महत्त्व जास्त आहे. डाळवर्गीय पिकांमध्ये, तूर, हरभरा, मूग, उडीद, मसुर, वटाणा इ. डाळपीके महत्त्वाची आहेत. यामुळे डाळीचे मोठया प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. महाराष्ट्र हा डाळवर्गीय पिकांच्या उत्पादनाच्या बाबतीत एक महत्त्वपूर्ण राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील दाळ पिकांचे क्षेत्र हे मराठवाडयात सर्वाधिक असलेले दिसून येते. अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्त्व लक्षात घेवून दाळ उद्योगांचा विकास मोठया प्रमाणात झालेला आहे. देशभरातून दाळीची मागणी सतत वाढत चाललेली दिसून येते. मागणी व पुरवठा यांचे संतुलन साधण्यासाठी सरकारकडून विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या जातात. यात व्यापारी, गोदामधारक व साठा असणारे यांची भूमिका महत्त्वाची आहे. 1891 साली लोकमान्य टिळकांनी लातूर येथे सूत गिरणी सुरु केली होती. नंतरच्या काळात औद्योगिक विकासाला चालना मिळाली आणि अनेक उद्योगांची स्थापना झाली. या उद्योगांपैकी दाळ उद्योग हे लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. त्यामुळे त्यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

लातूर जिल्हयामध्ये जवळपास सुमारे 70 डाळ मिल्स आहेत. डाळ मीलचे वर्गीकरण दोन प्रकारांत करता येते. मोठ्या डाळ मिल्स व मिनी डाळ मिल्स हे दोन्ही प्रकारचे लातूर जिल्हयात स्थापन झालेले दिसून येतात. कृषी आधारित डाळ उद्योग

हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा उद्योग आहे. मालाची उपलब्धता, जागा, पाणी, वाहतुक, मूलभूत सोयी, उद्योजकांना दिले जाणारे प्रोत्साहन, हमालाचे अनुकूल धोरण यामुळे डाळ उत्पादनात लातूर जिल्हयाने आघाडी घेतलेली आहे. या उद्योगामुळे शेतकरी, कामगार, भांडवलदार ह्या सर्वांचाच फायदा होतो. उद्योगाचे विकेंद्रीकरण होते. हे उद्योग ग्रामीण भागातही चालतात. यामुळे स्थानिक बाजारपेठेचा विकास होतो.

अभ्यास क्षेत्र

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील लातूर जिल्हा निवडलेला आहे. लातूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी येतो. लातूर जिल्हयाचा अक्षवृत्तीय विस्तार 18^{0}05' ते 18^{0}07' उत्तर अक्षवृत्त व रेखावृत्तीय विस्तार 73^{0}25' ते 77^{0}25' पूर्वे रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. जिल्हयाच्या उत्तर सीमेवर परभणी, हिंगोली तर पूर्वेस नांदेड, दक्षिणेस कर्नाटक राज्याची सीमा तर पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा, वायव्येस बीड जिल्हयाची सीमा आहे

लातूर जिल्हयाचे एकुण क्षेत्रफळ 7157 चौ.कि.मी. आहे. भारतीय जनगणना अहवाल 2011 नुसार लातूर जिल्हयाची एकूण लोकसंख्या 24,55,543 इतकी आहे. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने लातूर जिल्हयात लातूर, उदगीर, अहमदपूर, शिरूर अनंतपाळ, देवणी, जळकोट, चाकूर, निलंगा आणि औसा अशा एकूण दहा तालुक्यांचा समावेश होतो. लातूर जिल्हा हा कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागात आहे. त्यामुळे कर्नाटक राज्यातून डाळवर्गीय पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते व ते उत्पादन लातूर, उदगीर या बाजारपेठेत सहज उपलब्ध होते. त्यामुळे लातूर व उदगीर या तालुक्यात डाळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते.

अभ्यासाची उद्दिष्टे

संशोधनासाठी दाळ उद्योगाचे आर्थिक योगदान अभ्यासण्यासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

1) लातूर जिल्ह्यातील दाळ उद्योगाचा उदय आणि विकास अभ्यासणे.

2) लातूर जिल्ह्यातील दाळ उद्योगातील मागणी व पुरवठा यांचा अभ्यास करणे.

3) लातूर जिल्ह्यातील दाळ उद्योगाचे व्यवस्थापन अभ्यासणे.

4) दाळ उद्योगाविषयीची शासकीय धोरणे अभ्यासणे.

5) दाळ उद्योगाचे लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील योगदान अभ्यासणे.

अभ्यासाची गृहितके

संशोधनासाठी दाळ उद्योगाचे आर्थिक योगदान अभ्यासण्यासाठी खालील गृहितके मांडण्यात आली आहेत.

1) लातूर जिल्ह्यातील दाळ उद्योगाचा विकास होत आहे.

2) दाळ उद्योगामुळे रोजगार निर्मिती होते.

3) दाळ उद्योगाची प्रक्रिया आणि व्यवस्थापन यामुळे लातूरला जिल्ह्याला नवी ओळख मिळाली आहे.

4) दाळ उद्योगाविषयी असलेल्या शासकीय धोरणांची अंमलबजावणी होते.

5) दाळ उद्योगाने लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

संशोधन पद्धती

प्राथमिक सामग्री :

दाळ उद्योजकांच्या मुलाखती, प्रश्नावली, निरीक्षण इत्यादी माध्यमांतून प्राथमिक सामग्रीचे संकलन केले जाईल.

दुय्यम सामग्री :

दुय्यम माहितीचे संकलन मासिके राज्य व केंद्र सरकारचे अहवाल, शासकीय रेकॉर्ड, वर्तमानपत्रे, पुस्तके, आयोग, परिषदा, मासिके, इंटरनेट इत्यादी माध्यमातून केले जाईल.

नमुना निवड

लातूर जिल्हयातील काही तालुक्यात दाळ उद्‌योगाचा विकास झालेला आहे तर काही तालुके नवीन निर्माण करण्यात आले आहे त्यामुळे उद्‌योगाचे वितरण असमान स्वरूपाचे आहे. त्यामुळे निवडक तालुक्यातील प्रत्येकी 10 याप्रमाणे 60 दाळ उद्‌योगांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

अध्ययन कालावधी

अध्ययनासाठी इ.स.2018 ते 2027 या कालावधीतील या दाळ उद्‌योगाचे जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान अभ्यासण्यात येणार आहे.

व्याप्ती व मर्यादा

इ.स.2018 ते 2027 या कालावधीतील या दाळ उद्‌योगाचे जिल्हयाच्या आर्थिक विकासातील योगदान अभ्यासणे ही प्रस्तुत अध्ययनाची व्याप्ती असून प्रस्तुत संशोधन लातूर जिल्हयापुरते मर्यादित आहे ही संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

सांख्यिकीय तंत्रे

प्रथम व दुय्यम पद्धतीने गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून विविध सांख्यिकीय तंत्रामध्ये कोष्टके, आलेख, प्रमाण विचरण, सहसंबंध गुणक, केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे इत्यादी तंत्राचा वापर केला जाईल.

प्रकरण रूपरेषा

प्रस्तुत शोधप्रबंधाची मांडणी एकूण सहा प्रकरणात करण्यात येणार असून ते खालीलप्रमाणे आहेत.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे -संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे - लातूर जिल्ह्यातील दाळ उद्योगाचा उदय आणि विकास

प्रकरण चौथे -दाळ उद्योगातील प्रक्रिया व अडचणी

प्रकरण पाचवे - दाळ उद्योगाचे व्यवस्थापन

प्रकरण सहावे - दाळ उद्योगाविषयीची शासकीय धोरणे

प्रकरण सातवे - दाळ उद्योगाचे लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील योगदान

प्रकरण आठवे-निष्कर्ष व शिफारशी

शेवटी संदर्भ ग्रंथ सूची व काही परिशिष्ट्ये जोडण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ

1) लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2001-02 ते 2019-20

2) लातूर जिल्हा जनगणना अहवाल 2001, 2011

3) लातूर जिल्हा गॅझेटिअर

4) www.latur.ac.in

5) www.laghuudyog.in

6) https://dcmsme.gov.in

7) www.commerce.nic.in

संशोधक
गजानन हरिदास पळनाटे
एम.कॉम, सेट-नेट

मार्गदर्शक
प्रा.डॉ.संतोष निवृत्तीराव घोंगडे
एम.कॉम, पीएच.डी.
वाणिज्य विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर